# अंमली पदार्थ विरोधी कक्ष,
# गुन्हे शाखा, बृहन्मुंबई

**-: प्रेस नोट :-** **दिनांक - १६/०७/२०२६**

**मेफेड्रॉन (एम.डी.) अंमली पदार्थाची प्रयोगशाळा नष्ट केलेल्या गुन्हयात अपर लिंक तपासून 2-Bromo, 4- मिथाईल प्रोपीफेनॉन रसायनाची अवैध विक्री करणारे ०४ आरोपी अटक केलेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| **गु.र.क्र. व कलम** | :- | गु.र.क्र. ५४/२०२६, कलम ८ (क) सह २२ (क),२९ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ सह क. ३,२५ भारतीय हत्यार कायदा १९५९ |
| **दाखल दिनांक** | :- | दिनांक २६/०६/२०२६ रोजी |
| **गुन्हयाचे घटनास्थळ** | :- | आग्रीपाडा, मुंबई. |
| **आरोपीची संख्या** | :- | ०४<br>**एकूण आरोपी अटक १०** |
| **जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत** | :- | **एकुण १४ किलो ४९३ ग्रॅम मेफेड्रॉन (एम.डी), लिक्वीड एम.डी. व इतर साहित्य, अं.कि.रु. ५०,७४,०३,१००/-**<br>**एकूण २१० किलो ३०० ग्रॅम 2 – Bromo, 4- मिथाईल प्रोपीफेनॉन सदृश्य रसायनाचे ४ कॅन, अं.किं.रु. ८४,१२,०००/- व एक बी.एम.डब्ल्यु. स्क्रॅप मोटार कार क्र. DL-30-BV-1856, अं.किं.रु. ०२,००,०००/-** |

दिनांक २५/०५/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्ष, कांदिवली युनिट येथे प्राप्त झालेल्या खबरीवरुन पथकाने तात्काळ व प्रभावीपणे कारवाई करुन आग्रीपाडा, मुंबई परिसरात सापळा रचून राहते घरामध्ये तयार केलेली मोठी प्रयोगशाळा उध्वस्त करुन ग्राहकांना विक्री करीता बनविलेला मेफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ व अंमली पदार्थ तयार करण्यासाठी लागणारी रसायने जप्त करुन एकुण ०४ आरोपी अटक केले होते. सदर गुन्हयाच्या पुढील तपासामध्ये अटक आरोपीतांनी लपवून ठेवलेला 2 – Bromo, 4- मिथाईल प्रोपीफेनॉन सदृश्य रसायन विक्री करताना दि. ११/०७/२०२६ रोजी एकूण ०२ आरोपी अटक करुन त्यांचेकडून एकूण २१० किलो ३०० ग्रॅम रसायन व एक बी.एम.डब्ल्यु मो./कार जप्त करण्यात आली.

दिनांक १५/०७/२०२६ रोजी आरोपीतांच्या संपर्कातील संशयीत इसमांचे मोबाईल क्रमांक बाबत तांत्रिक तपास करुन शिळफाटा रोड, डोंबिवली याठिकाणी सापळा रचून एकूण ०४ इसमांना पोलीस पथकाने शिताफीने ताब्यात घेतले. सदर आरोपीतांकडे केलेल्या तपासामध्ये ते 2 – Bromo, 4- मिथाईल प्रोपीफेनॉन या अंमली पदार्थाची अवैधरित्या विक्री करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गुन्हयात त्यांना रितसर अटक करण्यात आली.

सदरची यशस्वी कामगिरी ही मा.श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा.श्री.अनिल कुंभारे, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), मा.श्री. कृष्णकांत उपाध्याय, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), मा.श्रीमती. पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई व मा. श्री. सुधीर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्ष (गुन्हे शाखा) अंतर्गत कांदिवली युनिट येथील प्रभारी पोलीस निरीक्षक, श्री. राहूल लोखंडे व पथक यांनी केली आहे.

----ooo----